**नक्षलग्रस्त गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यातील विशेष अभियान पथक (C-६०) मधील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्रोत्साहनपर "C-६० सेवा पदक" घोषित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्र. पीएमडी-०२२६/प्र.क्र.३२/पोल-१,**
दुसरा मजला, मंत्रालय (मुख्य इमारत), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १७ एप्रिल, २०२६

***प्रस्तावना :-***

महाराष्ट्र राज्यातील सशस्त्र माओवादी कारवायांना प्रभावीपणे रोखण्याकरिता, दि.०१ डिसेंबर, १९९० रोजी विशेष अभियान पथक (C-६०) स्थापन करण्यात आले. प्रारंभी या पथकात ६० जवान कार्यरत होते. सध्या गडचिरोली जिल्ह्यात २९ पथके व गोंदिया जिल्ह्यात ०९ पथके कार्यरत असून, गडचिरोली येथील प्रत्येक पथकामध्ये २८ जवान / अधिकारी व गोंदिया येथील प्रत्येक पथकामध्ये २० जवान / अधिकारी कार्यरत आहेत.

२. गडचिरोली व गोंदिया हे जिल्हे माओवादी/नक्षलवादी कारवायांनी प्रभावित असल्यामुळे, गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये जाहीर केलेल्या सुधारित वर्गीकरणानुसार सदर दोन्ही जिल्ह्यांचा समावेश, Legacy & Thrust Districts या श्रेणीत करण्यात आलेला आहे.

३. विशेष अभियान पथक (C-६०) हे महाराष्ट्र राज्यातील माओवादी विरोधी कारवायांमध्ये अग्रभागी कार्यरत असून, एरिया डॉमिनेशन, लाँग रेंज पेट्रोलिंग, शॉर्ट रेंज पेट्रोलिंग, गुप्त माहितीच्या आधारे मोहिमा नियमितपणे राबवित असते. या मोहिमा प्रामुख्याने घनदाट जंगल, डोंगराळ भाग, नदी-नाले असलेल्या दुर्गम परिसरात, प्रतिकूल हवामानात राबविण्यात येतात. सदर पथकातील अधिकारी / अंमलदार यांची निवड ही अत्यंत कठोर शारीरिक व मानसिक चाचण्यांद्वारे करण्यात येते. निवड झाल्यानंतर त्यांना कमांडो प्रशिक्षण केंद्र, किटाळी (जि. गडचिरोली) येथे, जंगल टॅक्टीस कॅमाफ्लाईस, सर्क्युलर ॲम्बुश, फिल्ड क्राफ्ट, मॅप रिडिंग, ॲम्बुश, काऊंटर ॲम्बुश, ग्राऊंड कव्हर, टॅक्टीकल मुव्हमेंट, रोड ओपनिंग, रिव्हर क्रॉसिंग, कॉर्डन व सर्च इत्यादी विषयाबाबत सखोल प्रशिक्षण देण्यात येते.

४.    तसेच, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर येथे जंगल वॉरफेअर बाबत नाविण्यपुर्ण प्रशिक्षणाने C-६० कमांडो पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्रशिक्षित करण्यात येते. C-६० पथकाची सेवा ही अत्यंत खडतर व विशेष अशी आहे. या पथकात कार्यरत पोलीस अधिकारी / अंमलदार यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडीत असताना, शारिरीक क्षमता व फायरिंग स्कील निरंतरपणे उत्तम ठेवणे आवश्यक आहे. राज्यातील माओवादी चळवळ नियंत्रणात आणण्यात विशेष अभियान पथकाचा मोठा वाटा असतो.

५.    या पथकातील अधिकारी / अंमलदारांना त्यांच्या शौर्यपूर्ण व उल्लेखनीय कार्यासाठी आतापर्यंत ३२० पोलीस शौर्य पदके, ६ राष्ट्रपती शौर्य पदके, ८ गुणवत्तापूर्वक सेवा पदके तसेच २ शौर्यचक्र प्रदान करण्यात आलेली आहेत.

६.    फोर्स वन (Force One) या दलामध्ये सलग दोन वर्षे सेवा करणाऱ्या कमांडो अधिकारी / अंमलदारांना “विशेष सेवा पदक” प्रदान करण्यात येते. तसेच, जलद प्रतिसाद पथक( Quick Response Team) मध्ये सलग दोन वर्षे सेवा करणाऱ्या अधिकाऱ्यांना व चार वर्षे सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना “विशेष सेवा पदक व प्रशस्तीपत्र” प्रदान करण्यात येते.

७.    त्याच धर्तीवर, सशस्त्र माओवादी कारवायांना प्रभावीपणे रोखणा-या तसेच नक्षलवादाविरोधात अत्यंत कठीण परिस्थितीत कार्यरत असलेल्या विशेष अभियान पथक (C-६०) मधील पोलीस अधिकारी / अंमलदार यांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांच्या गुणवत्तापूर्ण सेवेची शासनस्तरावर दखल घेण्यासाठी “C-६० सेवा पदक” देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

***शासन निर्णय :-***

गडचिरोली व गोंदिया या नक्षलग्रस्त जिल्ह्यांतील विशेष अभियान पथकामध्ये (C-६०) सेवा बजावणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना प्रोत्साहित करून त्यांचे मनोबळ वाढविण्यासाठी, त्यांच्या गुणवत्तापूर्ण सेवेची शासनाकडून दखल घेऊन, "C-६० सेवा पदक" देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे. सदर पदक सन २०२६-२७ या आर्थिक वर्षापासून प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर सेवा पदक खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रदान करण्यात येईल :-

(i) विचार क्षेत्रातील पोलीस अधिकारी / अंमलदार यांचे सेवा अभिलेख उत्कृष्ट असले पाहिजे, त्यांचेविरुध्द कोणतीही प्राथमिक किंवा विभागीय चौकशी प्रलंबित नसावी, न्यायालयात कोणतेही खटले प्रलंबित नसावे, तसेच त्यांना त्यांच्या सेवाकाळात कोणतीही जबर शिक्षा झालेली नसावी.

(ii) विशेष अभियान पथक (C-६०) निर्मितीपासून, जे पोलीस अधिकारी / अंमलदार सदर पथकात कार्यरत होते व सध्या शासकीय सेवेत कार्यरत आहेत, अशा पोलीस अधिकाऱ्यांनी सलग दोन वर्षे सेवा व पोलीस अंमलदारांनी सलग तीन वर्षे सेवा, या पथकात पूर्ण केलेली असावी. तसेच, त्यांचे मागील ०५ वर्षांचे सेवा अभिलेख उत्कृष्ट असावेत.

(iii) ज्या वर्षी पदक जाहीर होईल त्या अगोदरच्या वर्षाच्या ३१ डिसेंबर पर्यंत सदर अधिकारी यांना दोन वर्षे व अंमलदार यांना तीन वर्षाचा कार्यकाळ पुर्ण झालेला असावा.

(iv) सदर पदकाचे प्रस्ताव संबधित पोलीस अधीक्षक, हे पोलीस उप-महानिरीक्षक यांच्या मार्फतीने पोलीस महासंचालक कार्यालयास सादर करतील. तद्नंतर, पोलीस महासंचालक कार्यालय सदर प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करेल. शासन मान्यतेनंतर सदर पदकांचे वितरण करण्यात येईल.

(v) सदर सेवा पदक दरवर्षी महाराष्ट्र दिन, ०१ मे रोजीच्या पूर्वसंध्येला पोलीस महासंचालक यांच्याव्दारे घोषित करण्यात येईल.

३. पदकांची संख्या :- प्रथम दोन वर्षांकरिता दरवर्षी ५०० पदके वितरित केली जातील, त्यापुढे तिसऱ्या वर्षापासून, पात्र होणाऱ्या अधिकारी / अंमलदार यांना पदक वितरित केले जाईल.

४. सदर पदकाचे स्वरूप खालीलप्रमाणे असेल :-

(i) मुख्य पदक हे ताब्यांचे (Copper) असेल व त्याचा आकार गोल असेल. पदकाचा व्यास ३५ मिली मीटर व जाडी ३ मिली मीटर असेल,

(ii) पदकाला लावण्यात येणारी रिबीन ३० मिली मीटर रुंद, ८० मिली मीटर लांब व २ मिली मीटर जाडीची असून, रिबीनवर डाव्या बाजूने पिवळा रंग १६ मिली मीटर,

त्यानंतर लाल व पिवळा रंग अनुक्रमे २,२ मिली मीटर व त्यानंतर लाल रंग १० मिली मीटर इतका असेल.

(iii) पदकाच्या पुढील बाजूस महाराष्ट्र पोलीस दलाचे मराठीतील बोधचिन्ह असेल व त्याचे खाली C-६० सेवा पदक असे लिहीलेले असेल. तसेच बोधचिन्हाच्या मागील बाजूस विशेष अभियान पथकाचे बोधचिन्ह असेल. पदकाच्या दोन्ही बाजूवर बोधचिन्ह तसेच वाक्य कोरलेले (EMBOSS) असेल.

५. यावर होणारा खर्च "मागणी क्र.बी-१, २०५५-पोलीस (००) जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल (२०५५०१६८) १३-कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली त्या - त्या वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२६०४१७११०५३८७६२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SUGRIV SAMBHAJI DHAPATE

Digitally signed by SUGRIV SAMBHAJI DHAPATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FC102DE27DC1B41E747AC6CBB491C4209459C3CF340720EA98FD1D95B19C9F65, cn=SUGRIV SAMBHAJI DHAPATE
Date: 2026.04.17 11:12:47 +05'30'

**(सुग्रिव धपाटे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री (गृह / शहरे ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मुख्य सचिव यांचे सचिव मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान महालेखापाल (लेखा व हकदारी)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
१०) पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११) महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई
१३) महासमादेशक, गृहरक्षक दल व संचालक, नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
१५) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई

१६) सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
१७) सर्व अपर पोलीस महासंचालक
१८) सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
१९) सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२१) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
२२) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२३) वित्त विभाग (व्यय ७/अर्थसंकल्प-२), मंत्रालय, मुंबई.
२४) उप सचिव, रोख शाखा, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय मुंबई.
२५) सहाय्यक संचालक, भापोसे कक्ष, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२६) गृह विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई
२७) निवड नस्ती-पोल-१.